**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 24.06.2024** **वार – सोमवार**

---

## लोकसभाशपथविधी

18 व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन आजपासून सुरू झालं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात भर्तृहरी महताब यांना हंगामी सभापती म्हणून शपथ दिली. त्यानंतर सर्व सदस्यांचा शपथविधी सुरु झाला. पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, जळगावच्या खासदार रक्षा खडसे, केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी मराठीतून शपथ घेतली.

## पुणेड्रग्जअटक

पुण्यातील फर्ग्युसन रस्त्यावरील लिक्वीड लिजर लाउंजमधील अमली पदार्थ सेवन प्रकरणी उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाई केली आहे. याप्रकरणी आतापर्यंत 9 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून 8 जणांना अटक करण्यात आल्याची माहिती पोलीस उपायुक्त संदीप गिल यांनी दिली आहे. व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या मुलांचा पुणे पोलीस शोध घेत आहेत; या मुलांनी जेवण आणि मद्यावर 80 ते 85 हजार रुपये खर्च केले; असं गिल यांनी सांगितलं. या प्रकरणी 40 ते

50 जणांची चौकशी केली जाईल. सूचना देऊनही अंमलदार आणि अधिकाऱ्यांनी लक्ष ठेवण्यात दिरंगाई केल्याबद्दल दोन अधिकारी आणि दोन अमलदारांवर कारवाई करण्यात आल्याची माहितीही संदीप गिल यांनी दिली.

**शंकराचार्य**

आदीगुरू शंकराचार्य यांनी रचलेल्या 'दि वर्क्स ऑफ आदि शंकराचार्य' या शृंखलेच्या सांगितीक मालिकेचं प्रकाशन आज पुण्यात करण्यात आलं. त्याचबरोबर गुरु शंकराचार्य लिखित 'सौंदर्य लहरी'चं सादरीकरण, लोकार्पण आणि याविषयीची माहिती ज्येष्ठ गायिका अनुराधा पौडवाल आणि कविता पौडवाल यांनी पत्रकारांना दिली. आदि गुरु शंकराचार्य यांचं तत्वज्ञान आजच्या तरुणाईपर्यंत पोहचवण्याच्या उद्देशानं हे सादरीकरण केल्याचं पौडवाल म्हणाल्या.

**वीणासहस्त्रबुद्धेपुरस्कार**

कलानिधी संस्थेतर्फे दिला जाणारा विदुषी वीणा सहस्त्रबुद्धे स्मृती पुरस्कार यंदा, जयपूर-अत्रौली घराण्याच्या युवा गायिका ऋतुजा लाड यांना जाहीर झाला आहे. येत्या शनिवारी, 29 तारखेला पुण्यात पुरस्कार वितरण होणार आहे. या सोहळ्याच्या निमित्तानं सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक पंडित भुवनेश कोमकली यांचं गायन होणार आहे. हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

**<u>चांदणीचौकस्वागतशिल्प</u>**

पुण्यातील चांदणी चौकाच्या सुशोभीकरणासाठी महापालिका उभारत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या 17 फूट पुतळ्याला तसंच नियोजित स्वागत शिल्पाला स्थानिकांनी विरोध दर्शवला आहे. गरज पडली तर या निर्णयाविरुद्ध न्यायालयात जाण्याचा इशारा बावधन सिटीझन फोरम या स्वयंसेवी संघटनेनं दिला आहे. शहरातील नागरिकांना सुविधा पुरवणारे अनेक पायाभूत प्रश्न आणि समस्या प्रलंबित असताना या स्वागत शिल्पावर कोट्यवधी रुपये खर्च करण्याची काही गरज नाही, याउलट त्या निधीतून शहरासाठी आवश्यक असणारी अन्य प्रलंबित कामे पूर्ण केली जावीत अशी भूमिका बावधन वासियांनी मांडली आहे.

**<u>योग्यताप्रमाणपत्र</u>**

पुण्यात शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांना योग्यता प्रमाणपत्र घेणं पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयानं अनिवार्य केलं आहे. यासंदर्भात सर्व व्हॅन, रिक्षा आणि बस चालकांना नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. पुण्यात 6 हजार 800 हुन अधिक वाहनांमधून 4 लाखाहून अधिक विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यात येते.

**<u>टायफॉईडप्रादुर्भाव</u>**

पुण्यात टायफॉईड, डेंग्यू, मलेरियाचा प्रादुर्भाव वाढत असून दूषित पाण्यामुळे कॉलरा, कावीळ, डायरियाचे रुग्ण देखील वाढत आहेत. टायफॉईडचे रुग्ण ज्या भागात आढळले तिथले पाण्याचे नमुने चाचणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले असून डेंग्यूचा प्रसार रोखण्याबाबतही उपाययोजना करण्यात येत आहेत, अशी माहिती पुणे महापालिकेचे सहाय्यक आरोग्य अधिकारी डॉ. सूर्यकांत देवकर यांनी दिली.

**<u>प्रधानमंत्रीपीकविमा</u>**

प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत भात, बाजरी, सोयाबीन या पिकांचा समावेश आहे. एक रुपयात पीक विमा काढण्याची अंतिम मुदत 15 जुलैपर्यंत आहे, पिकांचं संभाव्य आर्थिक नुकसान टाळण्यासाठी पीक विमा योजनेत शेतकऱ्यांनी सहभागी व्हावं, असं आवाहन पुणे जिल्हा  कृषी विभागाने केलं आहे.

**<u>क्रीडा टी-20</u>**

पुण्यात सुरू असलेल्या स्पार्टन मान्सून लीग अजिंक्यपद टी-20 क्रिकेट स्पर्धेत स्पाटर्न क्रिकेट क्लबने पुणे रेंजर्स क्रिकेट अॅकॅडमीचा 3 गडी राखून पराभव करून विजयी सलामी दिली. अन्य एका सामन्यात विट्रॉन ऑप्टो इलेक्ट्रॉनिक्स संघानं सॅफरॉन क्रिकेट क्लबचा 66 धावांनी पराभव करून पहिला विजय नोंदवला.

## <u>हवामान</u>

पुणे आणि परिसरात उद्या आकाश अंशत: ढगाळ राहून हलक्या पावसाची शक्यता आहे. घाटमाथ्यावर तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडेल असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**